# प्रेसनोट

दि.०१/११/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | संगमनेर शहर पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.८९९/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | बाळासाहेब मधुकर यादव, वय–५३ वर्षे, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, वर्ग–३, संगमनेर शहर पो.स्टे., जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | १,०००/– रुपये तडजोडी अंती ८००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ८००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांना त्यांचे निंबाळे गावात दिवाळी सणानिमित्त फटाका स्टॉल सुरु करण्यासाठी संगमनेर शहर पोलीस स्टेशनचा नाहरकत प्रमाणपत्र देणेकरीता पोलीस उप निरीक्षक यादव यांनी १०००/– रुपये लाच मागणी करत असल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरून पंचासमक्ष दिनांक ३१/१०/२०२३ रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई करण्यात आली असता सदर लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान पंचासमक्ष आरोपी लोकसेवक बाळासाहेब मधुकर यादव, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, संगमनेर शहर पो.स्टे. यांनी तक्रारदार यांचेकडे फटाका स्टॉलचे नाहकरत प्रमाणपत्र देण्यासाठी १०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोड अंती ८००/– रुपये लाचेची मागणी करुन ती स्वीकारल्याचे मान्य केले. त्यानुसार आरोपी लोकसेवक यादव यांचे विरुध्द संगमनेर शहर पोलीस स्टेशन येथे सापळा आयोजित करण्यात आला. सदर सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक यादव यांनी तक्रारदार यांचेकडुन ८००/– रूपये लाचेची रक्कम पंच साक्षीदारा समक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर